# प्रारुप सेवाप्रवेश नियम

| अनु.क्र. | पदनाम |
|---|---|
| १. | लेखापाल |
| २. | सहाय्यक लेखाधिकारी |
| ३. | लेखाधिकारी |
| ४. | मुख्य लेखाधिकारी |
| ५. | वित्त नियंत्रक |
| ६. | सह संचालक किंवा उप संचालक (सांख्यिकी ) |
| ७. | संशोधन अधिकारी (सांख्यिकी ) |
| ८. | संशोधन सहाय्यक (सांख्यिकी ) |
| ९. | सांख्यिकी सहाय्यक (सांख्यिकी ) |

RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक ९७] सोमवार, ऑक्टोबर १२, २०२०/आश्विन २०, शके १९४२ [पृष्ठे १९, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २३७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृहनिर्माण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ८ ऑक्टोबर २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू.--- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"लेखापाल"** या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे. आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दि. २३ ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सुचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सुचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

## सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू.---महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "**लेखापाल**" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे:-

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील **"लेखापाल (सेवा प्रवेश) नियम, २०२०"** असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

**(अ)** "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

**(ब)** "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र अधि. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

**(क)** " विभाग" याचा अर्थ शासनाचा गृहनिर्माण विभाग.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील " लेखापाल" या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :-

(क) प्राधिकरणामधील लिपिक/ लिपिक-टंकलेखक संवर्गातील ज्या व्यक्तीनी लेखापाल पदोन्नतीसाठी आवश्यक असलेली विभागीय अर्हता परीक्षा उत्तिर्ण केली असेल, अशा व्यक्तींमधून पात्रता व जेष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन;

किंवा

(ख) भारत सरकार, महाराष्ट्र शासन किंवा इतर स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील तसेच महालेखापाल कार्यालयाकडून घेण्यात येणारी विभागीय लेखापाल परिक्षा उत्तिर्ण केलेल्या व्यक्तींमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार प्रतिनियुक्तीने.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ७५ : २५ असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परिक्षा ( आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ८ ऑक्टोबर २०२०.

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू .---महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"सहाय्यक लेखाधिकारी"** या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दि. २३ ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सुचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सुचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "**सहाय्यक लेखाधिकारी**" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे:-

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील "**सहाय्यक लेखाधिकारी,** (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

**(अ)** "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

**(ब)** "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) " विभाग" याचा अर्थ शासनाचा गृहनिर्माण विभाग.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "**सहाय्यक लेखाधिकारी**" या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :-

(क) प्राधिकरणामधील लेखापाल संवर्गातील नियमित सेवेचा तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या वर्षांचा अनुभव असलेल्या व्यक्तींमधून पात्रता व जेष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन;

किंवा

(ख) संचालक, लेखा व कोषागारे यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात MFAS (गट-ब) या पदावर किमान तीन वर्ष सेवा पुर्ण केलेल्या व्यक्तींमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार प्रतिनियुक्तीने.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ७५:२५ असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परिक्षा ( आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदोन्नतीने पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ८ ऑक्टोबर २०२०.

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"लेखाधिकारी"** या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दि. २३ ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२.उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सुचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सुचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"लेखाधिकारी"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे:-

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील "लेखाधिकारी (वर्ग-१) (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

**(अ)** "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"लेखाधिकारी"** या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :-

(क) प्राधिकरणामधील सहाय्यक लेखाधिकारी संवर्गातील नियमित सेवेचा तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या वर्षांचा अनुभव असलेल्या व्यक्तींमधुन पात्रता व जेष्ठतेच्या आधारे **पदोन्नती देऊन;**

किंवा

(ख) संचालक, लेखा व कोषागारे यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात MFAS (गट-अ कनिष्ठ) या पदावर किमान तीन वर्ष सेवा पुर्ण केलेल्या व्यक्तींमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार प्रतिनियुक्तीने.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ७५:२५ असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परिक्षा ( आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदोन्नतीने पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ८ ऑक्टोबर २०२०.

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक : सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"मुख्य लेखाधिकारी"** या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दि.२३ ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक : सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"मुख्य लेखाधिकारी"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे:-

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील **"मुख्य लेखाधिकारी** (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

**(अ)** "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

**(ब)** "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील **"मुख्य लेखाधिकारी"** या पदावरील नियुक्ती, प्राधिकरणातील लेखाधिकारी हे पद धारण करणाऱ्या ज्या व्यक्तीला त्या पदावरील नियमित सेवेचा तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या वर्षांचा अनुभव असेल, अशा व्यक्तींमधुन पात्रता व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन करण्यात येईल.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परिक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ८ ऑक्टोबर २०२०.

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक : सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"वित्त नियंत्रक"** या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दि. २३ ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२.उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"वित्त नियंत्रक"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे:-

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील **"वित्त नियंत्रक"** (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

**(अ)** "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

**(ब)** "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील वित्तीय सेवेतील **"वित्त नियंत्रक"** या पदावरील नियुक्ती, संचालक, लेखा व कोषागारे यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात MFAS (गट-अ कनिष्ठ) या पदावर किमान तीन वर्ष सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार प्रतिनियुक्तीने करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ८ ऑक्टोबर २०२०.

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९५ /गृनिभू, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम,१९७६ च्या कलम ४९ अन्वये शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"सह संचालक किंवा उप संचालक (सांख्यिकी)"** या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे. आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दि.२३ ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२.उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९५ /गृनिभू महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"सह संचालक किंवा उप संचालक (सांख्यिकी)"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे:-

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील **"सह संचालक किंवा उप संचालक (सांख्यिकी)** (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

**(अ)** "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

**(ब)** "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या **"सह संचालक किंवा उप संचालक (सांख्यिकी)"** या पदावरील नियुक्ती महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयात समकक्ष पदावर व वेतनश्रेणीत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांमधून सुयोग्य असेल अशा अधिकाऱ्यांची नेमणूक शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ८ ऑक्टोबर २०२०.

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र. ९५ /गृनिभू, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम,१९७६ च्या कलम ४९ अन्वये शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"संशोधन अधिकारी (सांख्यिकी)"** या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे. आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दिनांक २३ ऑक्टोबर २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र. ९५ /गृनिभू महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"संशोधन अधिकारी (सांख्यिकी)"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे:-

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील **"संशोधन अधिकारी (सांख्यिकी)** (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

**(अ)** "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

**(ब)** "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या **"संशोधन अधिकारी (सांख्यिकी)"** या पदावरील नियुक्ती महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयात समकक्ष पदावर व वेतनश्रेणीत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांमधून सुयोग्य असेल अशा अधिकाऱ्यांची नेमणूक शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ८ ऑक्टोबर २०२०.

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९५/गृनिभू, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम,१९७६ च्या कलम ४९ अन्वये शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"संशोधन सहाय्यक (सांख्यिकी)"** या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दिनांक २३ ऑक्टोबर २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र. ९५ /गृनिभू- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"संशोधन सहाय्यक (सांख्यिकी)"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे:-

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील **"संशोधन सहाय्यक (सांख्यिकी)** (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

**(अ)** "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

**(ब)** "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या **"संशोधन सहाय्यक (सांख्यिकी)"** या पदावरील नियुक्ती महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयात समकक्ष पदावर व वेतनश्रेणीत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांमधून सुयोग्य असेल अशा अधिकाऱ्यांची नेमणूक शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

**गृहनिर्माण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ८ ऑक्टोबर २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९५/गृनिभू, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम,१९७६ च्या कलम ४९ अन्वये शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"सांख्यिकीय सहायक (सांख्यिकी)"** या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दिनांक २३ ऑक्टोबर २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२.उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**सेवा प्रवेश नियमाचा मसुदा**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९५/गृनिभू महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरीलं **"सांख्यिकीय सहायक (सांख्यिकी)"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे:-

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील **"सांख्यिकीय सहायक (सांख्यिकी)** (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या **"सांख्यिकीय सहायक (सांख्यिकी)"** या पदावरील नियुक्ती महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयात समकक्ष पदावर व वेतनश्रेणीत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांमधून सुयोग्य असेल अशा अधिकाऱ्यांची नेमणूक शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.